SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART-TWO

**(असाधारण)**

सोमवार, दिनांक ७ एप्रिल,२०१४

**अधिसूचना**

क्रमांक : ३०/२०१४ दिनांक : ०७ एप्रिल, २०१४.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-मध्य उप विभाग असाधारण क्र.४५ अधिसूचना दिनांक २९ मार्च,२०१४

संदर्भांकीत अधिसूचनेन्वये परक्राम्य संलेख अधिनियम,१८८१ (१८८१ चा अधिनियम २६)च्या कलम २५ मध्ये दर्शविलेल्या व भारत सरकारच्या गृहमंत्रालयाची अधिसूचना क्र.३९/१/६८- जेयुडीएल-तीन,दिनांक ८ मे १९६८अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासनाव्दारे,सार्वत्रिक लोकसभा निवडणुका-२०१४ च्या अनुषंगाने विद्यापीठ परिक्षेत्रांतील अमरावती,अकोला,बुलढाणा व यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदार संघात मतदानाच्या दिवशी दिनांक १० एप्रिल,२०१४ रोजी सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आलेली आहे.

सबब,सर्व संबंधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की,वरील आदेश विद्यापीठ व सर्व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत असून,त्यानुसार विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभाग व प्रशासकीय विभाग,तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांना गुरूवार दिनांक १० एप्रिल,२०१४ रोजी सुटी जाहीर करण्यात येत आहे.

मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये -

स्वा/-
( दिनेशकुमार जोशी )
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

*****